दयावान



जातक लोक-कथा

मराठी : अश्विनी बर्वे




खूप वर्षापूर्वी एका नगरात एक व्यक्ती राहत होती, ती इतकी श्रीमंत होती की, त्याच्या महालातल्या कितीतरी दालने बहुमुल्य वस्तूंनी भरलेले होते.



महालाच्या गॅलरीत आणि बागांमध्ये सामान पडलेले होते. कोणत्याही वस्तूची इच्छा कोणी केली तर त्या वस्तू त्याच्याकडे भरपूर पडलेल्या होत्या.

पण त्याला सगळ्यात अधिक आनंद आपली संपत्ती त्या लोकांमध्ये वाटून मिळे जे लोक त्याच्यापेक्षा कमी भाग्यवान होते. त्याची अविरत उदारता बघून लोक त्याला दयावान म्हणत असत. कपडे आणि खाण्याच्या वस्तू घेवून तो रोज दुपारी बागेत येई आणि ज्यांना ज्या गोष्टीची गरज आहे ती गोष्ट त्यांना देई. तो कोणतीही विनंती ठोकरून टाकू शकत नसे. जर कोणी त्याच्याकडे उत्कृष्ट पुस्तके किंवा गालिचे, त्याच्या रथाचे सगळ्यात चांगले घोडे मागितले तर तेव्हा तो कोणताही विचार न करता मागणाऱ्याला त्या गोष्टी देवून टाकत असे.

“संपत्ती दुःखाचे केवढे मोठे कारण आहे,”त्याने विचार केला. “श्रीमंत लोक चिंतेत असतात की त्यांचे धन ते गमावून तर बसणार नाही आणि गरीब व्यक्ती धनाच्या अभावाने चिंतेत असतात. अधिक संपत्तीची मला काय आवश्यकता आहे? माझ्या धनामुळे अभावग्रस्त लोकाच्या जीवनात आनंद येवू दे.”






यामुळे गरीब लोक आपल्या दुःखापासून सुटका करू शकत आणि आपली संपत्ती त्या अभागी लोकांमध्ये वाटून दयावान आनंदी होत असे. सगळीकडे ही बातमी पसरली की, संकटाच्या काळी कोणीही त्याच्याकडे मदत मागू शकतो. दयावानची प्रसिद्धी देवलोकापर्यंत पोहचली.त्या लोकात दिव्य देवता राहत होत्या. जे सगळ्यात उंच पहाडाच्या खूप वर उडू शकत होते. देवाचे देव, शक्तिशाली शक्र देवाला धरतीवर राहणाऱ्या मानवाकडे बघणे आणि त्याच्या साहसाची आणि सच्चेपणाची परीक्षा घेणे, त्याला आवडत असे.

“जर हा माणूस खरंच दयाळू असेल तर संकटे आणि अवघड परिस्थती त्याच्या चरित्राला अजून उजळून टाकतील.”

“एका श्रीमंत माणसाला दयाळू होणे सोप्पे आहे. पण बघायचे हे आहे की आपले धन गमावल्यानंतरही तो दान करतो का?”




त्या रात्री दयावानच्या भांडारात ठेवलेले दागिने आणी संगीत वाद्य शक्र देवाने गायब केले. पण द्यावानाला त्याची काही पर्वा वाटली नाही. मग गालिचे आणि पडदे गायब झाले.

आणि मग कपाटात ठेवलेले कपडे गायब झाले. तेव्हा सुद्धा द्यावानाने काहीच पर्वा केली नाही. द्यावानाला लालचरहित बघून शक्र देवाला आश्चर्य वाटले. आणि मग त्यांनी त्याची कठोर परीक्षा घेण्याचे ठरवले.

दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा दयावान उठला तेव्हा त्याने आपला पूर्ण महाल रिकामा झाल्याचे पाहिले. जसे की एखाद्या वादळामुळे सगळे सामान उडून गेले.कोणतेही फर्निचर वाचले नव्हते की कपडे, धान्याचा एक दाणाही वाचला नव्हता. एक दोरी, एक खुरपं, आणि रात्री घातलेला शर्ट एवढेच फक्त वाचले होते.

“केवढी अजब गोष्ट घडली आहे!” दयावानने विचार केला. “कदाचित एखादा निर्धन मनुष्य लपत छपत येवून रात्री सगळं सामान घेवून गेला असेल. जर असे झालं असेल तर माझ्या संपत्तीचा सदुपयोगच झाला.पण माझे असे रिकामे घर बघून इतर गरीब लोक किती निराश होतील. या खुरपाचा उपयोग करून मी त्यांना मदत करू शकेल.





शेतात जावून, गावच्या गरीब लोकांबरोबर तो घास कापू लागला.त्याने हा विचार केला की जगात असे काही लोक आहेत की त्यांच्याकडे त्याच्यापेक्षा कमी संपत्ती आहे. त्याने कडक उन्हात खूप परिश्रम केले..

“मला आजपर्यंत समजले नव्हते की गरीब माणसाचे जीवन किती कठीण असते. मला इतके असहाय्य वाटते की, खाण्यासाठी मी कोणाकडे भिक्षा मागू शकत नाही.तरीपण गरीब लोकांना आपल्या मुलांचे पोट भरावे म्हणून भीक मागावी लागते. आजारी लोकांना शक्तिशाली आणि निरोगी लोकांची मदत घ्यावी लागते.

“प्रत्येकाला आनंदी राहावे वाटते आणि प्रत्येकाला कष्टाची भीती वाटते.आपण सगळे एकसारखे आहोत आणि या जगात एकमेकांच्या बरोबर आहोत. जोपर्यंत माझ्या आजूबाजूचे लोक कष्टात असतांना, मी प्रसन्न कसा होवू शकतो?”


लोकांना मदत करण्याची त्याची इच्छा दिवसेंदिवस वाढत गेली. म्हणूनच तो अधिक कठोर परिश्रम करू लागला. “जर मी पुरेसा घास कापला तर माझ्या गरीब मित्रांना देण्यासाठी माझ्याकडे काहीतरी असेल.”

आपलं उत्पादन कापून जे काही त्याला मिळत होते, ते सर्व तो त्या लोकांना वाटून टाकत असे,जे गरजवंत होते.मुलं आणि मुली, वडील आणि आई, जे भुकेले होते आणि आजारी होते आणि ज्यांच्याजवळ खूप थोडे होते आणि ज्यांच्याकडे काहीच नव्हते.ते सर्वजण दयावानाच्या जवळ येत आणि ते काही सांगण्याच्या आधीच तो त्यांना सोन्याचे नाणे देत असे.

त्या गरीब, वृद्ध व्यक्तीला आपले धन गरिबांना वाटतांना बघून बाजारातले व्यापारी आश्चर्य-चकित होत असत आणि निराशेने आपली मान हलवत असत.

“अरे भल्या माणसा,तू तुझ्याकडे लक्ष का देत नाही आणि तुझ्या परिवाराची काळजी का घेत नाही?

त्यांचे बोलणे ऐकून दयावान हसे आणि म्हणे “हा सगळा माझाच तर परिवार आहे. कोण म्हणतं की आम्ही एकमेकांचे नातेवाईक नाही आहोत? कदाचित कोणत्यातरी काळी आणि जागी ही गरीब, भुकेली स्त्री माझी आई असेल..”





पण दयावानाची परीक्षा जे देवांचे देव शक्र घेत होते, ती परीक्षा अजून समाप्त झाली नव्हती. जादुई ढगामध्ये लपून ते आकाशात प्रकट झाले, कारण दयावानाशिवाय कोणी त्यांना बघू नये. ते म्हणाले:

“मुर्खा! दान देण्याच्या आपली सवयीवर नियंत्रण ठेव. यामुळे तुझी धनसंपत्ती वाढेल. परत धन संग्रह करून तू अधिक दान देवू शकशील. जेव्हा देण्यासाठी काही नसते तेव्हा दान न देण्याचा दोष लागत नाही.”

दयावान म्हणाला, “शक्र देवा, जे तुम्ही म्हणत आहात ते मी करू शकत नाही. आमच्या आसपास कितीतरी असे लोक आहेत, जे कष्टात आहे.जर कोणी गरीब माणूस उपाशी आहे आणि आज माझ्याकडे मदत मागत असेल तर त्याला मी धनवान होईपर्यंत वाट बघायला लावू शकत नाही. ज्या व्यक्तीला मदत करण्याची इच्छा आहे ती व्यक्ती तेव्हाच सगळं देईन जेव्हा कोणाला त्याची गरज आहे. मी दान देणं बंद करणार नाही, कारण यामध्ये दुसऱ्याचे हित आहे आणि माझा आनंद आहे.



शेवटी, शक्र देवाला विश्वास वाटला. “आता मला समजलं की तू एक खरा आणि दृढ स्वभावाचा माणूस आहे. तुझे उदार चरित्र सूर्या सारखे झगमगेल, कारण स्वार्थाच्या काळ्या ढगांना तू कायमस्वरूपी बाजूला केले आहे.

तू धनवान अस की निर्धन, तू तुझ्या स्वभावावर दृढ राहिला. जशी वाऱ्याची झुळूक एका पहाडाला हलवू शकत नाही तसेच मी तुझा निश्चय डळमळीत करू शकलो नाही. श्रीमान, मला या गोष्टीचा स्वीकार करावाच लागेल.

शक्र देवाने आपला हात हलवला आणि दयावानाला आपली सारी संपत्ती परत मिळाली.महालातल्या सगळ्या वस्तू परत आल्या. सारे दागिने तिजोरीत आणि अन्नाचे सगळे दाणे भंडारात परत आले.

“मी तुझी संपत्ती गायब केली होती. मला क्षमा कर आणि भविष्यात तू आपले दागिने असेच दानात देत रहा.जसे ढग पाऊस देतात.”

दयावान नेहमी दान देत राहिला आणि एक काळ असा आला की जेव्हा जगातल्या प्रत्येक व्यक्तीवर तो प्रेम करू लागला. त्याची कहाणी आपल्याला दान देण्यात सुख आहे हे सांगते.

जर आपले हृदय उदार असेल तर आपली प्रसन्नता खरी असेल. जे सुख तुम्ही दुसऱ्याला द्याल तेच सुख तुमच्याजवळ परत येईल.

